प्रा. विजयकुमार पाईकराव

दि

॥ प्रज्वालितो ज्ञानमय: प्रदीप ॥

शिक्षण प्रसारक संस्थेचे,

## शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर, जि.अहमदनगर.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रमा अंतर्गत संयुक्त विद्‌यमाने आयोजित**

# राज्यस्तरीय चर्चासत्र

गुणवत्तापुर्ण शिक्षणासाठी गुणांकन दर्जा आणि अधिस्विकृती : गरज आणि आव्हाने

# RANKING & ACCREDITATION FOR QUALITY EDUCATION: NEED & CHALLENGES

**मंगळवार, दि. 30 जानेवारी, 2018**

Special Issue of an International

**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**

IMPACT FACTOR SJIF 2016-6.177

UGC APPROVED SR. NO. 49366, ISSN-2278-8808

**मुख्य संपादक**

**डॉ. भालचंद्र बाळकृष्ण भावे**

**सहसंपादक**

**प्रा. कविता किसनराव काटे**

**सहसंपादक**

**प्रा. राजू गुलाब शेख**

**सदस्य संपादक मंडळ**

प्रा. मंगल राधाकृष्ण आरोटे

प्रा. नयना भास्करराव पंजे

प्रा. संजय म्हाळस खेमनर

सौ. वर्षा नरेंद्र आडेप

# उदघाटनपर भाषण

**प्रा. विजयकुमार पाईकराव**
***यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.***

---

प्रास्ताविक :

गुणवत्ता ही लाट नाही, जी आली आणि गेली. गुणवत्ता ही सर्वत्र लागू पडणारी संकल्पना आहे. सतत सुधारणा घडवून आणण्यासाठी निरंतर सर्तक राहणे. अपरिहार्य असते. संस्थेच्या मालक, अधिकारी, कर्मचारी इ. सर्वांचा सहभाग गुणवत्तेच्या दिशेने होणा-या प्रयत्नांमध्ये असणे आवश्यक आहे. गुणवत्तेचे परिणाम ताबडतोब दिसून येत नाहीत. त्यासाठी प्रारंभी काही कालावधी पायाभूत प्रयत्नांसाठी घ्यावाच लागतो.

१) शब्दकोशामध्ये गुणवत्ता ( Quality ) म्हणजे गुण, जात, प्रकार, दर्जा, विशेष, धर्म इत्यादी शब्द देखील वापरले जातात.

आपले व संस्थेचे आणि समाजाचे उन्नयन करण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण महत्वाचे आहे. या करिता आपण गुनावात्तेचे अध्ययनार्थी अन गुणवत्तेचे राजदूत झाले पाहिजे.

२) सर्वसामान्यपणे आपण दैनंदिन जीवनात एखादी वस्तू, सेवा किंवा संस्था अनुभवतो तेव्हा जर ती गुणवत्तापूर्ण असेल तर आपल्या एकदम लक्षात येते. त्यासाठी विचार किंवा अभ्यास करावा लागत नाही. गुणवतेचे अस्तित्व किंवा तिचा अभाव कधी लपून राहत नाही. उत्कृष्ट व्याख्यान, चांगले गायन, चांगले भोजन, चांगले पुस्तक, चांगला पेन, चांगला शिक्षक अनुभवल्यावर आपण उत्स्फूर्त होऊन त्याला दाद देतो. आपल्या या मूल्यमापनात, निरीक्षणात कोणते निकष लावले याचा विचार आपण करत नाही.

थोडक्यात एखाद्या वस्तू सेवा किंवा संस्था निर्माण केल्या जातात. त्यांचे समाधान हाच गुणवत्तेचा निर्देशक असतो. Customer satisfaction is the ultimate determinant of quality. गुणवत्ता ही वस्तुनिष्ठ असते. सर्वमान्य आणि वस्तुनिष्ठ निकषांवरून ती ठरवली जात नाही. याचा अर्थ असा होत नाही कि यात विश्वासार्हता असू शकत नाही. जेव्हा लाभार्थी प्रचंड संख्येने एखादी वस्तू, सेवा किंवा संस्था या बाबतीत आपली पसंती व्यक्त करतात. त्याबद्दलचे समाधान उत्साहाने व्यक्त करतात, तेव्हा त्यात गुणवत्ता आहे. असा संदेश साहजिकच पसरत जातो.

संस्थेच्या प्रत्येक पगारी कर्मचा-याने गुणवत्तेच्या दिशेने होणा-या प्रयत्नांमध्ये सहभागी होणे आवश्यक असते. गुणवत्तेचे परिणाम ताबडतोब दिसून येत नाहीत.

गुणवत्तेसाठी अविरत प्रयत्न करण्याची गरज असते. गुणवत्तेत केलेल्या कार्यानंदाचा अभिमान वाटतो. स्वतःचे आणि समाजाचे उन्नयन घडून येते. गुणवत्तेसाठी कार्य प्रक्रियांचा पद्धतशीर विचार, वृत्त आणि ग्राहक सामाधान, मानवी संसाधनाचा जोमदार विकास, दूरगामी विचार व

ISSN – 2278-8808 IMPACT FACTOR SJIF 2016-6.177

बांधिलकी ह्यासाठी सविस्तर कृतिकार्यक्रम तयार करावा लागतो. गुणवत्तेचे संख्यात्मक मापन करता येत नाही. तसा प्रयत्न केला तरी ते अचूक होईल अशी खात्री देता येत नाही. गुणवत्तेला कारणीभूत असलेले किंवा सूचक घटक यांच्या आधारावरच गुणवत्तेचे मूल्यांकन होत असते.

खरे तर मानवी जीवनात वैयक्तिक आणि सामुहिक गुणवत्तेचे स्थान, तिचे संपादन आणि जपणूक यासंबंधीचा विचार नेहमीच होत आलेला आहे. विविध समाजातून परंपरागत ज्या संस्काराची जडण - घडण होत असते. त्यात गुणवत्ता या संकल्पनेचा नक्कीच समावेश केला जातो. आयुष्य कसे जगावे. काय चांगले आणि काय वाईट. याचा सारासार विचार आणि मार्गदर्शन विविध स्रोतांकडून माणसाला बालपणापासूनच मिळत असते.

## गुणवत्तेची गरज :-

१) भारत हा जगातील सर्वात अशिक्षित लोकसंख्या असलेला देश आहे.

२) U.Dise अहवाल २०१४ -१५ नुसार

| | प्राथमिक शाळा | शासकीय | खाजगी संस्था |
|---|---|---|---|
| एकूण शाळा | १४ लक्ष | ११ लक्ष | ३ लक्ष |
| विद्यार्थी प्रवेश | १९.७७ कोटी | ११.९ कोटी | ८.५६ कोटी |
| एकूण शिक्षक | ८० लाख | ३३ लाख | ४७ लाख |

अ) मान्यता नसलेल्या संस्था - २३५२९

ब) मदरसा - ३७५०

विद्यार्थी प्रवेश - ३३ लाख

| माध्यमिक शाळा | शासकीय | खाजगी संस्था |
|---|---|---|
| | ४९ % | ५१ % |
| उच्चमाध्यमिक शाळा | ४२ % | ५८ % |

| |
|---|
| विद्यापीठे ७११ |
| महाविद्यालये - ४०७६० |
| प्राध्यापक - १४ लक्ष |
| विद्यार्थी संख्या - ३.३३ कोटी |

## गुणवत्तेतील आव्हाने :-

१. विद्यार्थी

२. प्राध्यापक - ग्रंथपाल व शारीरिक शिक्षकही प्राचार्य होण्यासाठी दावेदार

३. माजीविद्यार्थी संघ

४. अंतरवासिता व पाठाकरिता शाळा उपलब्धी

५. संस्था व्यवस्थापन मंडळ, विश्वस्थ आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

६. शासकीय अधिकार मंडळे

७. सलग्न विद्यापीठे

८. समित्या - उत्तरदायित्व

९. इतर संस्था, महाविद्यालये

## शिक्षणातील गुणवत्ता :-

गुणवत्ता ही अत्यंत व्यापक व सर्वसमावेशक अशी संकल्पना आहे. गुणवत्ता ही सापेक्ष असून ती आंतरिक व बाह्य गुणांचा संच असते. गुणवत्ता ही दर्जा निश्चित करते. ती ज्ञानावर कौशल्यावर व मूल्यांवर आधारित असते. व त्यांच्याशी निगडीत असते. म्हणूनच

ज्ञान + कौशल्ये + मूल्ये = गुणवत्ता

गुणवत्ता ही गतिमान तर असतेच, पण त्याच बरोबर ती धनात्मक असावी लागते. त्यातून निर्मिती व लाभप्रद प्रक्रिया घडली पाहिजे.

गुणवत्ता निवड आहे : संधी नाही. तसेच ती एक प्रवास आहे. मुक्काम नाही. गुणवत्तेला थांबणे ही प्रक्रिया मान्य नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे गुणवत्ता ही पाहणा-याच्या दृष्टिकोनावर अवलंबून असते.

प्राचीन कालीन दृष्टीकोन - शैक्षणिक गुणवत्ता ही साविद्या या विमुक्तये, या संस्कृत सुभाषितावर भर देणारी आहे.

हे संस्कृत वचन सुभाषित' म्हणून शाळांच्या भिंतीवर, फलकांवर लिहिलेले आढळते. पण त्याचा अर्थ ख-या अर्थाने समजावून घेण्याची तसदी आपण घेत नाही. जी मुक्त करते ती विद्या' असे नुसते त्याचे भाषांतर करणे म्हणजे त्याचा खरा अर्थ नव्हे.

महात्मा गांधीजींनी या वचनाचा फार सुंदर अर्थ सांगितला आहे. ते म्हणाले होते, शिक्षण हे खूप पैसे आणि मोठे अधिकार मिळविण्याचे साधन आहे. असे लोक मानतात. पैशाच्या आणि अधिकाराच्या पायी त्यांना गुलामगिरी आवडू लागते. खरे तर विद्या म्हणजे लोकाना उपयोगी असणारे सर्व प्रकारचे ज्ञान आणि मुक्त म्हणजे जीवनातल्या सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका होणे. गुलामगिरी म्हणजे कोणाच्यातरी अधीन असणे किंवा आपणच निर्माण केलेल्या छोट्या गरजांच्या आहारी जाणे. अशा प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका करील ते खरे शिक्षण.

तसेच गुणवत्ताही त्या शिक्षणप्रक्रियेत घडविलेल्या व्यक्तीवरून ठरते. मानवी जीवन हे मुल्याकेंद्रित आहे. जीवनाच्या केंद्रभागी जीवनमूल्ये व त्यांच्या भोवती ज्ञान अशी शैक्षणिक संरचना म्हणजेच शैक्षणिक गुणवत्ता होय. ज्ञानाचे उपयोजन कसे करावयाचे यांचे मार्गदर्शन

जीवनमुल्यांमुळे घडते. ज्ञानाची उपयुक्तता जीवनधारणेमुळे ठरली पाहिजे. उदाहरणार्थ, अनुकेंद्रीय ऊर्जेचा उपयोग विध्वंसक शस्त्रांच्या निर्मितीसाठी करावयाचा किंवा मानवी जीवनाच्या कल्याणासाठी करावयाचा हे ठरविण्याच्या क्षमता जे प्रदान करते ते जीवनमूल्ये असते. अशा प्रकारची जीवनदृष्टी देणारे शिक्षण हेच खरे दर्जेदार शिक्षण असते व तेच गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणता येईल. असे मत मर्मर मुखोपाध्याय यांनी Total quality Management in education या ग्रंथात व्यक्त केले आहे.

शैक्षणिक गुणवत्ता ही केवळ व्यावसायिक दृष्टीकोनातूनच तपासणे योग्य ठरणार नाही. ती एक केवळ विचारधारा असू शकेल. कारण मानवी जीवनात भावनिक व आंतरिक विकासालाही अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण व्यक्तिविकास हा बोधात्मक, भाषात्मक व क्रियात्मक पातळीवर घडत असतो. त्यामुळे शैक्षणिक प्रक्रिया आणि शैक्षणिक आंतरक्रिया व्यक्तीच्या भावनिक आणि आंतरिक विकासाला वृद्धिंगत करतात.

म्हणून शैक्षणिक गुणवत्तेचा विचार करतांना शिक्षणातील उत्कृष्टता, शिक्षणातील मूल्यांचा सहभाग, शैक्षणिक जीवनमूल्ये, शैक्षणिक निष्पत्तीची निश्चितता, अनुभवांची देवाण घेवाण, योग्य अनुभवांचा वापर, शैक्षणिक प्रक्रियेतील तृटीचे निरसन, ज्ञानाचे उपयोजन, कौशल्यांचे दृढीकरण, मूल्यांची जपवणूक, गतिमानतेची वृद्धी, समाज, पालक व विद्यार्थी या घटकांची अपेक्षापूर्ती, कर्तव्यनिष्ठा व गुणवत्तेशी तडजोड न करणे या सर्वांचा एकत्रितपणे विचार करावा लागेल.

## शिक्षणातील गुणवत्तेचे मापदंड :-

१) शालेय वातावरणातील मानसिक निरसता कमी करणे. मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग करून चरितार्थ भागवता येईल अशी क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत नसल्यामुळे व अनेक तानतनावांखाली अध्यापकाला नोकरी करावी लागत असल्यामुळे शिक्षण क्षेत्र हे 'निरस' बनत आहे.

२) शिस्त व वक्तशीरपणा या दोन्ही बाबी शिक्षणक्षेत्रातून फारच कमी होऊ लागल्या आहेत. एका संशोधकाचा निष्कर्ष हा फारच बोलका आहे. शिक्षकांना दिलेल्या प्रश्नावललींमधून व घेतलेल्या मुलाखातींवरून 'Our teachers are regular but not punctual.' शिक्षक दररोज शाळेवर येत, पण वेळ पाळीत नाहीत.

३) शालेय वातावरणातील स्वच्छता व योग्य जपणूक.

४) शालेय संपादनेतील प्रभुत्व : शाळेतील नववीपर्यंतचे निकालसुद्धा चांगलेच लागले पाहिजेत. (निकाल लागणे व निकाल लावणे यात फरक आहे.)

५) शाळाबाह्य संपादनेतील सहभाग : शाळेच्या बाहेर जाऊन विद्यार्थ्याने आणि अध्यापकांनी शैक्षणिक योग्यता दाखविली पाहिजे.

६) सर्व मानवी घटकांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग : हा सहभाग असल्याशिवाय प्रत्येकाला शाळा ही आपली आहे असे वाटणार नाही. शाळेबद्दल आपुलकी निर्माण होणार नाही.

७) शाळेचे संघटनात्मक वातावरण : शाळा ही एकसंघ असली पाहिजे. संघटीत असली पाहिजे. हवेदावे, मत्सर, असूया, द्वेष, तिरस्कार, हिणकस वृत्ती, इत्यादीला थाराही नसला पाहिजे.

८) समाज, पालक व विद्यार्थी यांचे समाधान : खरे पहिले असता या सर्वांचे समाधान करणे हीच खरी शैक्षणिक गुणवत्ता आहे.

**९) मनुष्यबळाचा योग्य वापर व विकास : शाळा / महाविद्यालयामध्ये जास्तीत जास्त मनुष्यबळाचा योग्य वापर करण्याची क्षमता निर्माण झाली पाहिजे व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली पाहिजे.**

**१०) सुव्यवस्थितपणे समस्या निराकरण करणे : शिक्षणक्षेत्र हे विस्तारित स्वरूपातील क्षेत्र आहे. दैनंदिन कामकाजात अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्या कुशलतेने सोडविणे व त्यावर उपाययोजना शोधून काढणे हा गुणवत्ता विकासाचाच भाग आहे.**

**११) संशोधनावर भर : दैनंदिन कार्य करीत असतात अनेक प्रकारच्या शैक्षणिक व इतर समस्या निर्माण होऊ शकतात. त्या सोडविण्यासाठी संशोधनावर भर दिला पाहिजे.**

## अध्यापकांची भूमिका

**१) प्रत्येक विद्यार्थ्याला आपला 'स्व' ओळखण्यास शिकविणा-या शिक्षणपद्धतीचा विचार होणे आवश्यक आहे.**

**२) विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास करण्यासाठी शाळा / महाविद्यालयाने व शिक्षकाने प्रयत्न केले पाहिजेत.**

**३) व्यक्तीभेद मान्य करुनही आपल्याजवळ बुद्धी आहे. हा आत्मविश्वास प्रत्येक विद्यार्थ्यात जागृत करणे आणि ती बुद्धी कोणत्या क्षेत्रात चालते ते प्रत्येकाला जाणून घेता येईल अशा शैक्षणिक कार्यक्रमाची आखणी करणे.**

४) अभ्यासक्रमातील कृतियुक्त शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण याकडे लक्ष केंद्रित करणे.

५) अवांतर वाचनामुळे पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वाढते हे पटवून देणे. ज्ञानाशिवाय गुणवत्ता निर्माण करता येणार नाही.

६) सहशालेय कार्यक्रमात सहभाग नोंदविणे, ज्यामुळे सुप्त गुणांचा विकास होऊ शकेल.

७) जागतिकीकरणामुळे वेगवेगळ्या देशांत जाऊन शिक्षण आणि नोकरीची संधी प्राप्त करावयाच्या असतील तर वेगवेगळ्या भाषा व त्यातही इंग्रजी येणे ही काळाची गरज आहे.

८) कोणतेही क्षेत्र कमी न समजता त्या क्षेत्रातील प्राविण्य संपादन करून आपली गुणवत्ता वाढविता येते याची कल्पना विद्यार्थ्यात निर्माण करणे.

९) स्पर्धेच्या युगात परिश्रमाला तोड नाही. कष्टाशिवाय यश मिळत नाही. याचे उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण करून देणे.

१०) आर्थिक प्रश्नांचा बाऊ न करता त्यावर कशी मात करता येईल या दृष्टीने प्रयत्न करणे.

११) विद्यार्थ्यांमध्ये सर्वच बाबतीत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणे.

**उत्तमता :-** गुणवत्तेचा परमोच्च बिंदू म्हणजे उत्तमता.

उत्तमतेचे बहिरंग : नीटनेटकेपणा, प्रमाणबद्धता, अचूकता, सौंदर्य, गतिशीलता, तत्परता, प्रयोगशीलता, तपशीलवार नियोजन, नाविन्यता, कुशलता, भव्यता

उत्तमतेचे अंतरंग : निर्मळ शुद्धत्ता, प्रयोजन व हेतूची सुनिश्चितता, आशयपूर्णता, अभिनवता, प्रभावकरिता, सर्वसमावेशकता, सातत्य, उत्स्फूर्तता, स्वदेशिबाणा, नितीमत्ता

**विचार :-** विचार हे एक शास्त्र व कला होय. शास्त्र म्हणून विचार शुद्ध असला पाहिजे. विचाराला सुरुवात करतांना अचूक पुरेशी आणि आवश्यक अशी माहिती मिळवावी लागते. त्याबरोबर काही गृहीते धरावी लागतात. कोणत्याही गोष्टीविषयी भीती, राग, दुःख, तिटकारा, हाव किवा गैरसमजूत असेल तर विचारात अशुद्धता येते.

या सर्व भावना मनातून काढून न विचार करावा लागतो. कला म्हणून विचार सुंदरही असायला लागतो. त्यासाठी आदर, कृतज्ञता, भक्ती, प्रेम, उत्तमता किंवा विशालता व्यक्त करणे. हा विचारांचा हेतू असावा लागतो.

त्यामुळे विचारशुद्धीसाठी पूर्वग्रहविरहित गृहीते, अचूक माहिती व सकारात्मक हेतू या तीनही गोष्टी असाव्या लागतात. अशी विचारशुद्धी आपल्या विचारात आणण्याचा प्रयत्न सतत करावा लागतो. हाच भारतीय गुणवत्ता परिषदेचा ( Qulity Council of India ) मूळ उद्देश आहे.